Y.B. CHAVAN
COLLEGE OF PHARMACY
AURANGABAD

Maulana Azad Educational Trust's
Y.B. CHAVAN COLLEGE OF PHARMACY
(B.Pharm, M.Pharm & Research Centre)

ISO 21001:2018 CERTIFIED | NIRF-2023 ALL INDIA RANK 80TH
NAAC ACCREDITATION "A" GRADE WITH 3.23 CGPA SCORE

# Response of HEI to DVV findings for Metric ID -2.1.2

**Metric Id 2.1.2 :** *Percentage of seats filled against reserved categories (SC, ST, OBC etc.) as per applicable reservation policy for the first year admission during the last five years*

**Finding of DVV:** Provide a letter from the state or central government, in English indicating the reserved categories as per state rules. Also, Information on the number of seats reserved for different categories for each year. Share an admission record, submitted annually to the state OBC, SC, and ST cell for first-year students, with the principal's seal and signature

**Response of HEI:** **Clarifications in response to your queries is as follows:**

1. The college is recognized as Muslim minority institute hence a reservation of 51% is applicable to Muslim candidates only for admission. (Please find attached minority status letter, Annexure I).

2. There is no separate SC/ ST/ VJ-NT/ OBC reservation quota for Muslim minority institute as per the Maharashtra State Government norms.(Enclosed Government of Maharashtra Resolution policy No.MEI - 2012/P.NO.21/Office , Annexure II)

3.Muslim SC/ ST/ VJ-NT/ OBC candidates may seek admission within the minority quota.

4.SC/ ST/ OBC candidates can seek admission through general quota by centralized admission process through CET cell Maharashtra.

5. Therefore no separate admission records are submitted annually to the state OBC, SC, and ST cell for first-year students. However,SC/ ST/ VJ-NT/ OBC detail data of those students who are eligible for scholarship are submitted to Mahadbt portal (https://mahadbt.maharashtra.gov.in/) for scholarship

The response and supporting documents for the findings of DVV is as per the records of college.

Maulana Azad Educational Trust's Y.B. Chavan College of Pharmacy Aurangabad

Dr. M. H. Dehghan
Principal

Date: 29/04/2024

# ANNEXURE I : MINORITY STATUS CERTIFICATE

TRANSLATION Seal of

MRF TRANSLATION

Reg.No. VYAS/A'BAD/133/31431/09

Translated from Marathi

## GOVT. OF MAHARASHTRA

## COMETANT AUTHORITY AND PRINCIPAL SECRETARY,

## MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT,

## MANTRALAYA, MUMBAI= 400 032

MES- 2009/742/C.NO.39/2009/D-1 Date: 12.05.2009

## CERTIFICATE OF APPROVAL OF MINORITY STATUS

The **Maulana Azad Educational Trust, 3 – C Land, 41 Cuff Prade, Colaba**, an educational society, had applied for the grant of Religious Minority Education Society certificate as religious minority on 09-02-2009. On 22-04-2009, I am convinced on the basis of the presentation made by the office bearers, that the concerned society is run by the persons or group persons of the religious **minority** (Muslim) declared by the state government as prescribed in the Govt. Resolution, Minority Development Dept., No. MES-2008/ C.no.133/2008/D-1 dated July 4, 2008. Consequently, it is hereby declared that the aforesaid institution is a Religious (Muslim) Minority Educational Institution.

This certificate shall be applicable for the territory of Maharashtra state only. The status of religious minority to the said society will be applicable to all educational institutions run by the society.

The religious **minority** status granted to the above said educational society shall be valid from the educational year 2008-2009. The concerned society should comply with the terms and conditions as prescribed in the Govt. Resolution, Minorities Development Dept., No. MES-2008/C.No.133/2008/D-1, July 4, 2012, without fault.

Sd/-<br>
(Dr. T.F. Thetekra)<br>
Competent Authority cum Principal Secretary,<br>
Minorities Development Dept., Govt. of Maharashtra,<br>
Mantralaya, Mumbai 400032

MRF TRANSLATION Seal of

Translated by

14/5/18

Sk. Kasim Hussain

(B.Com, DBM)

Disclaimer: I do hereby solemnly state that the foregoing is the Translation of the attached document. MRF Translation does not accept any responsibility for the content of the document

# ANNEXURE I: MINORITY STATUS CERTIFICATE (MARATHI)

**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**
*अल्पसंख्याक विकास विभाग,*
*मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.*

क्रमांक:अशैसं-२००९/७४२/प्र.क्र.३९/२००९/का.१, दिनांक :- १२ मे, २००९.

**अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र**

**मौलाना आझाद एज्युकेशनल ट्रस्ट, ३ - सी लॅण्ड, ४१ कफ परेड, कुलाबा, मुंबई या शैक्षणिक संस्थेने** त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दि.९.२.२००९ रोजी अर्ज सादर केला होता. दि.२२.४.२००९ रोजी माझ्या समक्ष संबंधित संस्थेसोबत झालेल्या सुनावणी दरम्यान संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या सादरीकरणाच्या आधारे सदर संस्था ही अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकषांतर्गत राज्य शासनाने घोषित केलेल्या धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याकामधील व्यक्तींकडून अथवा व्यक्तींच्या समुदायाकडून स्थापित व संचालित करण्यात येत असल्याबाबत माझे समाधान झाले आहे. परिणामत: सदर संस्था ही धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था असल्याचे याद्वारे **घोषित करण्यात येत आहे.**

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

**( टी. एफ. थेकेकरा )**
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

# ANNEXURE II : Government Resolution No. MEI-2012/P.No.21/Office-5

Regarding to prescribe procedures for online application as well as Terms and conditions for granting religious/ linguistic minority status to educational institutions run by minorities in the State of Maharashtra,

**Government of Maharashtra**

Minority Department

Govt. Resolution No.: MEI-2012/P.NO.21/Office-5,

Ministry, Mumbai-400032.

Date: 27 May, 2013

Read –

1) Govt. Resolution No.: Governance Notification, Minority Development Department, No. MEI-2008/P.No.149/08/Off.-1, Dated 4/07/2008
2) Government Resolution No.: Government Decision, Minority Development Department, No. MEI-2008/P.No.133/2008/Off.-1, Dated 4/07/2008
3) Govt. Resolution No.: Minority Development Department No. MEI-2009/P.No.28/2009/Off.-5, Dated 15/05/2009
4) Government Resolution No.: Minority Development Department, No. MEI-2009/P.No.28/2009/Off.-5, Dated 24/07/2009
5) Govt. Resolution No.: Minority Development Department, No. MEI-2009/P.No.148/2009/Office-5, Dated 27/10/2009.
6) Government Resolution No.: Minority Development Department, No. MDD-2010/P.No.59/10/Office-5, Dated 1/04/2010
7) Government Resolution No.: Minority Development Department, No. MDD-2011/P.No.25/2011/Office-5, Dated 18/06/2011.
8) Government Resolution Number: Governance Corrigendum, Minority Development Department, No. MEI-2012/P.No.91/2012/Off.-5, Dated 16/03/2012
9) Govt. Resolution Number: Governance Corrigendum, Minority Development Department, No. MEI-2012/P.No.91/2012/Off.-5, Dated 18/05/2012
10) Government Resolution Number: Government Corrigendum, Minority Development Department, No. MEI-2012/P.No.91/2012/Off.-5, Dated 25/09/2012
11) Government Resolution Number: National Minority Educational Institutions Commission Act, 2004(2 of 2005) Revised (18 of 2006) and Revised (20 of 2010)

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy, V. R. CHAVAN, AURANGABAD

Preface –

In view of the recommendations made by the Administrative Reforms Commission to facilitate the administration and increase the availability of various services to the general public through e-governance, the government has made it possible for the government to facilitate online application by consolidating various government orders regarding the issuance of linguistic and religious minority status certificates was under consideration. With that in view all the aforesaid orders are being authorized and the following amended orders are being issued ruling.

The government has decided to improve the procedure for issuing religious/ linguistic minority status certificates to educational institutions run by minorities in the state and to accept applications online by providing minority status applications on the website www.mdd.maharashtra.gov.in from 1 June, 2013. However, the provisions of this GR will be applicable to all educational institutions from the date of commencement. The action will be taken as follows.

Part A

Eligibility of the competent authority for minority status certificate and other necessary points

1) Competent Authority: Article 30 of the Constitution of India and Hon. High Court, Mumbai and Hon. Considering the directions given by the Supreme Court from time to time, the Joint Secretary/ Deputy Secretary to the State Government, Minority Development Department is being declared as the competent authority for granting religious/ linguistic minority status to the educational institutions run by the minorities in the state.

2) Appellate Authority: Additional Chief Secretary/ Principal Secretary/ Secretary, Department of Minority Development is being declared as Appellate Authority. An appeal can be lodged with the Appellate Authority within 90 days from the date of such order against the order issued by the competent authority denying the recognition of minority status to the educational institution in Maharashtra.

3) Verification Officers: Two officers authorized by the District Collector in each district of the State will act as the verification officer for the proposals received in that district.

4) Scrutiny Officers: The Under Secretary/ Desk Officer of the Minority Development Department will be scrutiny officer for application submitted by Minority Institute for Minority Status.

5) Certificate of Religious/ Linguistic Minority Certificates Authority Area: Minority Certificate Recognition granted to religious/ linguistic minority educational numbers shall be limited to the State of Maharashtra only.

6) Certificates issued to trusts/ institutions/ companies/ firms apply to all institutions under their jurisdiction: Religious/ linguistic minority status granted to trusts/ institutions/ companies/ firms Accreditation Certificate will be applicable to all the educational institutes which are currently in operation and will be started in the future under the jurisdiction of the concerned Trust/ Company/ Firm/ Institution.

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

7) Eligibility Criteria for Submission of Application for Recognition of Religious/ Linguistic Minority Status.

i) Religious Minority Educational Institutions: Government Order, General Administration Department No: - RAA, 2005/ 89/ P. No. 19/2005/35, Dated 9 October 2006, the Muslim, Christian, Jain, Parsi, Buddhist and Sikh minority groups in the State published in the Government Gazette will be eligible to submit applications for the religious minority status certificate in their respective educational institutions.

ii) Linguistic Minority Educational Institutions: The trustee/ member/ board member of a minority educational institution in the State of Maharashtra whose mother tongue is any Indian language other than Marathi can apply for the recognition of minority status certificate for the relevant minority measure.

iii) Minority educational institutions submitting the documents will be eligible for grant of Religious Minority Status Certificate recognition.

iv) Regarding admission to minorities in Higher Technical and Vocational Educational Institutions conducted for the benefit of Minorities.

A) All minority institutes must conduct admission through CET or on merit basis by transparent procedure.

B) Aided religious/ linguistic minority educational institutions should admit at least 50% of their admission capacity to the students belonging to the minority group which they have got and on the remaining 50% of the seats non minority students can be admitted.

Also, while 50% of the seats are filled by non-minority students in the open category, it is mandatory to admit candidate from Scheduled Castes, Scheduled Tribes, Nomadic Castes, Deprived Castes, Special Backward Classes and other Backward Classes on the seats reserved for the weaker elements as per policy of educational department of state govt.

C) Unaided religious/ linguistic minority educational institutions should admit at least 51% of their admission capacity to the minority students of the minority group in which they belong and non-minority students in the remaining seats.

**Also, while filling up the remaining vacancies from non-minority students in the open category, the concerned educational institutions of the state government may voluntarily admit students from the Scheduled Castes, Scheduled Tribes, Nomadic Castes, Special Caste etc. in the society by referring to the guidelines of the reservation policy.**

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy, Aurangabad

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकांकडून
चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना
धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा
देण्यासाठी अटी व शर्ती तसेच ऑनलाईन
अर्जाबाबतची कार्यपध्दती विहित करणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक विभाग

शासन निर्णय क्रमांकः अशैसं- २०१२/प्र.क्र.२१/कार्या-५,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख:२७ मे, २०१३

वाचा —

१) शासन निर्णय क्रमांकःशासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग,क्र. असंस-२००८ / प्र.क्र.१४९ /०८ / का.-१, दिनांक ४/ ०७/२००८

२) शासन निर्णय क्रमांकःशासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अशैसं-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/ का.-१, दिनांक ४/ ०७/२००८

३) शासन निर्णय क्रमांकःशासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२००९/ प्र.क्र.२८/२००९/ का.-५, दिनांक १५/०५/२००९

४) शासन निर्णय क्रमांकःशासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अशैसं-२००९/प्र.क्र.२८/२००९/का.-५, दिनांक २४ /०७/२००९

५) शासन निर्णय क्रमांकःशासन पूरक पत्र, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अशैसं-२००९/प्र.क्र.१४८/ २००९/ कार्या-५, दिनांक २७/१०/२००९.

६) शासन निर्णय क्रमांकःशासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अविवि-२०१०/प्र.क्र.५९/१०/कार्या-५,दिनांक १ /०४/२०१०

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

७) शासन निर्णय क्रमांकःशासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग,क्र. अविवि-२०११/प्र.क्र.२५/२०११/कार्या-५, दिनांक १८/०६/२०११.

८) शासन निर्णय क्रमांकःशासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२०१२/ प्र.क्र.९१/२०१२/ का.-५, दिनांक १६/०३/२०१२

९) शासन निर्णय क्रमांकःशासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२०१२/ प्र.क्र.९१/२०१२/ का.-५, दिनांक १८/०५/२०१२

१०) शासन निर्णय क्रमांकःशासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र. अशैसं-२०१२/ प्र.क्र.९१/२०१२/ का.-५, दिनांक २५/०९/२०१२

११) शासन निर्णय क्रमांकःराष्ट्रीय अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम, २००४(२००५ च्या २) सुधारीत (२००६ चा १८) व सुधारीत (२०१० चा २०)

प्रस्तावना —

प्रशासनातील कार्यपध्दतीमध्ये सुलभता आणण्यासाठी आणि इ-गव्हर्नन्सच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना विविध सेवा सवलतींची उपलब्धता वाढविण्याच्या दृष्टीने प्रशासकीय सुधारणा आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन, भाषिक व धार्मिक अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दती विषयीच्या विविध शासन आदेशांचे एकत्रिकरण करुन ऑन लाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या दृष्टीने उक्त नमूद सर्व आदेश अधिक्रमीत करुन खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय—

शासनाने राज्यातील अल्पसंख्यांकाकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्याची कार्यपध्दतीत सूधारणा करुन ऑन लाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्याबाबत www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेस अर्ज उपलब्ध करुन देऊन दिनांक १ जून, २०१३ पासून अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि, या शासन निर्णयातील तरतुदी शासन निर्णय निर्गमित

झाल्याच्या दिनांका पासून सर्व शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रासाठी लागू राहतील. याबाबतची कार्यवाही खालील प्रमाणे करण्यात येईल.

भाग -अ

अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रासाठी सक्षम प्राधिकारी, संस्थेची पात्रता, अधिकार व इतर आवश्यक बाबी

१) सक्षम प्राधिकारी :- भारतीय संविधानातील कलम - ३०, तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई आणि मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेऊन राज्यातील अल्पसंख्यांककडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक दर्जाची मान्यता प्रदान करण्यासाठी राज्य शासनाचे सह सचिव/उपसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२) अपिलिय प्राधिकारी :- अल्पसंख्यांक विकास विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, यांना अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सक्षम प्राधिका-यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्याक दर्जाची मान्यता नाकारल्याबाबत किंवा शैक्षणिक संस्थेची अल्पसंख्याक दर्जाची मान्यता रद्द करण्याबाबत जारी केलेल्या आदेशांविरुध्द अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अशा आदेशाच्या दिनांक पासून ९० दिवसात अपिल करता येईल

३) पडताळणी अधिकारी :- राज्यातील प्रत्येक जिल्हयातील जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले दोन अधिकारी हे त्या जिल्हयातील प्राप्त प्रस्तावांसाठी पडताळणी अधिकारी म्हणून कामकाज पाहतील.

४) छाननी अधिकारी :- अल्पसंख्यांक विकास विभागाचे अवर सचिव / कार्यासन अधिकारी हे छाननी अधिकारी म्हणून अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेने सादर केलेल्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र अर्जाचे कामकाज पाहतील.

५) धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्राचे प्राधिकार क्षेत्र :- धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना प्रदान केलेले अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यता फक्त महाराष्ट्र राज्यापुरती मर्यादित राहील.

**६) ट्रस्ट / संस्था / कंपनी /फर्म यांना प्रदान केलेले प्रमाणपत्र त्यांच्या अधिपत्याखालील सर्व संस्थाना लागू करणे :** - ट्रस्ट / संस्था / कंपनी / फर्म यांना प्रदान केलेले धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक दर्जा



Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy AURANGABAD

मान्यता प्रमाणपत्र संबंधित ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांच्या अधिपत्याखालील सध्या सुरु असलेल्या व भविष्यात सुरु करणा-या सर्व शैक्षणिक संस्थांना लागू राहील, अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र संबंधित अल्पसंख्यांक ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांना मराठी व इंग्रजी भाषेत प्रदान करण्यात येईल.

**७) धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक दर्जाच्या मान्यतेसाठी अर्ज सादर करण्यासाठी पात्रतेचे निकष :-**

i) **धार्मिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था:-** शासन आदेश, सामान्य प्रशासन, विभाग क्र :-राअआ, २००५/८९/ प्र.क्र.१९/२००५/३५, दि. ९ ऑक्टोबर २००६ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, पारशी, बौध्द व शिख अल्पसंख्यांक समूह हे त्यांच्या शैक्षणिक संस्था संबंधित धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल करण्यास पात्र असतील.

ii) **भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था** :- महाराष्ट्र राज्यातील ज्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेच्या विश्वस्त / सदस्य / बोर्ड मेंबर यांची मातृभाषा मराठी व्यतिरिक्त इतर कोणतीही भारतीय भाषा असेल ती संस्था संबंधित अल्पसंख्यांक भाषेसाठी अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यतेसाठी अर्ज दाखल करु शकतील.

iii) **पुढीलप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता** करणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था भाषिक/धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यता प्रदान करण्यासाठी पात्र असतील.

अ) **ट्रस्ट** / संस्था / कंपनी / फर्म यांचे किमान ५०% पेक्षा जास्त **मूळ व सध्याचे** विश्वस्त / सदस्य हे संबंधित संस्था ज्या धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक दर्जाची मागणी करीत असेल त्या धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक समुहाचे असणे आवश्यक आहे.

ब) **तसेच** सदर संस्थेचे विश्वस्त व कंपनी /फर्म यांचे ५०% पेक्षा जास्त वरील विश्वस्त / सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवाशी असणे आवश्यक आहे.

क) **सदर** संस्थेच्या अंतर्गत राज्य शासनाने मान्यता प्रदान केलेली बालवाडी / शाळा / अपंग शाळा / व्यावसाय अभ्यासक्रम / तंत्रशिक्षण अभ्यासक्रम / महाविद्यालय / वैद्यकीय अभ्यासक्रम इ. शैक्षणिक अभ्यासक्रम सुरु असणे आवश्यक आहे.

८) <u>तात्पुरत्या दर्जा प्रमाणपत्राऐवजी कायमस्वरुपी अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र :-</u>

ज्या शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्यांक विकास विभागाखेरीज इतर राज्य शासनाच्या विभागाकडून *(उदा. सामान्य प्रशासन विभाग, शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग)* तात्पुरत्या स्वरुपात अल्पसंख्यांक दर्जाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे. अशा सर्व अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांनी तात्पुरत्या स्वरुपातील दर्जा कालावधीच्या समाप्तीनंतर या विभागाकडे कायमस्वरुपी दर्जा प्रमाणपत्रासाठी नव्याने ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

९) **अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यामध्ये सूट** :-

ज्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांना यापुर्वी शासनाच्या इतर विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांनी तसेच राष्ट्रीय अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था आयोग अधिनियम २००४ अन्वये कायमस्वरुपी दर्जा प्रमाणपत्र मान्यता प्रदान केली असल्यास पुन्हा अल्पसंख्याक विकास विभागाकडे अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही.

१०) **धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी पूर्ण करावयाच्या अटी व शर्ती :-**

**धार्मिक** / भाषिक अल्पसंख्यांक संस्था म्हणून अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यतेसाठी संबंधित अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेस खालील अटी व शर्तींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

i) **ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांच्या सदस्य संख्येत झालेला बदल अवगत करणे :-** अर्जदार अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेला अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र मान्यता प्रदान केल्यानंतर देखिल संस्थेने अटींची पुर्तता केली पाहिजे, तसेच त्यांच्या विश्वस्तांच्या अथवा व्यवस्थापन समितीच्या अथवा कार्यकारी मंडळाच्या रचेनत झालेल्या बदलाची माहिती प्रत्येक तीन वर्षांनी सक्षम प्राधिकारी यांना अनुसूचि-३ (change report) अथवा इतर कागदपत्राद्वारे कळविणे आवश्यक आहे.

ii) **संस्था प्रचलनाच्या अधिकाराबाबत :-** संबंधित धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक दर्जा मान्यता प्राप्त अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेस त्यांच्या व्यवस्थापनावर, शिक्षक व इतर कर्मचारी यांची नियुक्ती करण्याचा संस्थेला अधिकार असेल, तथापि संबंधित शिक्षक व कर्मचारी यांनी शासनाच्या संबंधित विभाग अथवा प्राधिकरण यांनी ठरविलेले शैक्षणिक पात्रता, अनुभव व पात्रता चाचणी (NET, SET व TET) इत्यादी तरतुदी यांची पुर्तता केली पाहिजे.

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy AURANGABAD

iii) अल्पसंख्याक **विद्यालयात अल्पसंख्याकांना प्रवेश देण्याबाबत :-** अनुदानित व विना अनुदानित अल्पसंख्यांक संस्थांनी विहित कालमर्यादेत गुणवत्तेनुसार पारदर्शक प्रवेश प्रक्रियेद्वारे, त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या सर्व पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले पाहिजेत आणि कोणत्याही पात्र अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा अर्ज संस्थेने नाकारता कामा नये. विनाअनुदानित शाळांना काही प्रमाणात बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना सुध्दा प्रवेश देता येईल व अनुदानित शाळांनी स्थानिक गरजांनुसार वाजवी प्रमाणात बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देणे अनिवार्य आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या राईट ऑफ चिल्डेंन टू फ्री ऍन्ड कम्पलसरी एज्युकेशन ऍक्ट,२००९ च्या कलम (१) मधील तरतुदीनुसार कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक शाळांना पहिली तसेच पूर्व प्राथमिक वर्गांच्या प्रवेशासाठी २५ टक्के वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक नाही. तथापि, कायम विनाअनुदानीत अल्पसंख्याक शाळांनी आपल्या इच्छेनुसार अल्पसंख्याक वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

iv) **अल्पसंख्यांक संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक शैक्षणिक संस्थांत अल्पसंख्याकांना प्रवेश देणेबाबत :- पदवी / पदविका व पुढे**

**अ)** सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी सामाईक प्रवेश चाचणीद्वारे किंवा गुणवत्तेद्वारे पारदर्शक पध्दतीने प्रवेश करावेत.

ब) **अनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी** त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५० % जागांवर त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित ५० % जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.

तसेच ५०% जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यामधून भरताना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक विभागांनी समाजातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जाती, विमुक्त जाती विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग इ.दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देणे बंधनकारक आहे.

Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

**क) विनाअनुदानित धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी** त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी ५१% प्रवेश त्यांना प्राप्त असलेल्या अल्पसंख्याक दर्जाच्या समुहाच्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना तसेच उर्वरित जागांवर बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

तसेच उर्वरित जागा खुल्या प्रवर्गातील बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांमधून भरतांना राज्य शासनाच्या संबंधित शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या स्वेच्छेने समाजातील अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, भटक्या जाती विमुक्त जाती विशेष प्रवर्ग इ. दुर्बल घटकांसाठी आरक्षित केलेल्या जागाप्रमाणे प्रवेश देता येईल.

**ड) प्रवेशासाठी वृतपत्रात जाहिरात देणे** :- सर्व भाषिक व धार्मिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी उच्च, तांत्रिक अथवा व्यावसायिक पदवी/पदविका अभ्यासक्रमाकरिता अल्पसंख्यांक कोटयातील उपलब्ध सर्व जागा (विनाअनुदानित ५१ % जागा व अनुदानित ५० % जागा यथास्थिती) नियमानुसार भरण्यासाठी कमीत कमी चार मुख्य वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. सदर चार जाहिरातीपैकी दोन जाहिराती राज्य स्तरावरील, दोन जाहिराती राष्ट्रिय स्तरावरील तसेच एक मराठी, दोन इंग्रजी, संबंधित भाषिक अल्पसंख्यांक दर्जा प्रदान असणाऱ्या अल्पसंख्यांक भाषेत ही जाहिरात कमीत कमी ८x८ म्हणजे ६४ स्क्वेअर सेंटीमीटर आकारात पुढे नमूद केलेल्या बाबींचा समावेश करुन जाहिरात प्रसिध्द करणे आवश्यक राहील. १२ वी चा निकाल लागताच पहिली जाहिरात इंग्रजी व मराठी / संबंधित संस्थेस दर्जा प्राप्त अल्पसंख्यांक भाषेत व दुसरी जाहिरात त्यानंतर १० दिवसांनी इंग्रजी व मराठी / संबंधित भाषेत प्रसिध्द करावी. (जाहिरात ***प्रसिध्दी अशासकीय संस्थाच्या संघटनेमार्फत एकत्रितपणे न देता ती प्रत्येक संस्थेने/ महाविद्यालयाने स्वतंत्रपणे देणे आवश्यक राहील.)*** सदर जाहिरात मजकुर प्रपत्र-४ प्रमाणे असावा.

**इ)** सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या मार्फत चालविण्यात येणा-या उच्च, तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व प्रवेशाची माहिती या निर्णयासोबतच्या ***प्रप्रत्र-५*** नुसार प्रवेश क्षमता, अल्पसंख्याकाकरीता राखीव जागा इ. प्रवेशासाठी अर्ज केलेल्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची यादी, प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी, त्यामध्ये अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची यादी याबाबतची माहिती संबंधित संस्थेने त्यांच्या संकेतस्थळावर देणे बंधनकारक आहे. प्रती वर्षी तांत्रिक व व्यावसायिक



Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad

Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy Aurangabad

अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेकरीता संबंधित प्राधिकारी यांनी निश्चित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर (after cut off date) दोन आठवडयात अल्पसंख्यांक विकास विभागास वरीलप्रमाणे माहिती सादर करावी व अल्पसंख्याक विकास विभागाचे portal वर submit करावी.

**ई) बिगर अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्रवेशाची परवानगी देणेबाबत :-** उपरोक्त प्रमाणे जाहिरात देऊन देखील अल्पसंख्यांक कोटयातील आवश्यक विद्यार्थी उपलब्ध झाले नाहीत तर अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त **अनुदानित व विनाअनुदानित डी.एड., बी.एड., व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक संस्थांनी या जागा गुणवत्तेनुसार बिगर अल्पसंख्यांक उमेदवारांमधून भरण्याकरिता प्रपत्र ४ व ५ प्रमाणे तसेच भाग-अ मधील परिच्छेद-१० (iv) प्रमाणे कार्यवाही करुन दिलेल्या ४ जाहिरातीची झेरॉक्स् प्रत सहित अर्ज करुन अल्पसंख्याक विकास विभागाची विनिर्दिष्ट पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.** सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर उपरोक्त संस्थेस बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थी भरण्यास या विभागाकडून मान्यता देण्यात येईल. **संबंधित प्राधिकरणाने डीएड, बीएड, तंत्रशिक्षण व वैद्यकीय शिक्षण या अभ्यासक्रमांना अल्पसंख्यांक विभागाच्या पुर्व परवानगी शिवाय अल्पसंख्यांक कोटयातील जागांचा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश करु नये.**

**फ)** अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित डीएड, बीएड, व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक शैक्षणिक संस्थांनी सलग तीन शैक्षणिक वर्षात अल्पसंख्यांक कोटयात उपलब्ध असलेल्या ५०%/५१% जागाच्या बदल्यात अल्प प्रमाणात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले तर, अशा शैक्षणिक संस्थांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्द करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

## भाग ब

## अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्राकरीता अर्ज करण्याची ऑनलाईन कार्यपध्दती

**१) ऑन लाईन अर्ज करणे :-**

i) धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्यांक दर्जा मान्यता मिळणेकरिता इच्छूक संस्थांनी **www.mdd.maharashtra.gov.in** या पोर्टलवर online अर्ज सादर भरावा.अर्ज भरतेवेळी अर्जदारांनी स्वत:चा user name आणि password तयार करावा व अर्जात भरावा. अर्जदाराने user name आणि password याची नोंद पुढिल कार्यवाही साठी जतन करुन ठेवावी.



Principal
Maulana Azad Educational Trust's
Y. B. Chavan College of Pharmacy
Aurangabad
Maulana Azad Educational Trust's Y. B. Chavan College of Pharmacy Aurangabad

ii) सदर अर्जासोबत **भाग-ब परिच्छेद-३** मध्ये दर्शविण्यात आलेले सर्व पुरावे scan करुन ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावे.

iii) या शासन निर्णय सोबतच्या **प्रपत्र - २, ३** नुसारची प्रतिज्ञापत्रेही scan करुन ऑनलाईन अर्जासोबत अपलोड करावे.

iv) अर्ज पुर्ण भरल्यानंतर व आवश्यक सर्व कागदपत्रे scan करुन अपलोड केल्यानंतर अर्ज online पध्दतीने submit करावा. (जर अर्जाचे सर्व रकाने भरले नसतील व सर्व आवश्यक कागदपत्रे upload केले नसतील तर अर्ज submit होणार नाही याची नोंद घ्यावी.)

v)अपलोड करतांना संस्थांनी फक्त सध्याच्या संबंधित अल्पसंख्याक सदस्यांचे धार्मिक/भाषिक पुरावे अपलोड करावे तसेच ज्या अल्पसंख्याक सदस्यांचे धार्मिक/भाषिक सदस्यांचे पुरावे अपलोड केले आहेत, त्याच सदस्यांचे रहिवाशी पुरावे अपलोड करावेत.

**vi)** online पध्दतीने भरलेल्या अर्जाच्या दोन printout काढून **भाग ब-मधील परिच्छेद**-३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती व प्रपत्र २ व ३ नुसारची प्रतिज्ञापत्रांच्या प्रती अर्जा सोबत जोडून एक प्रत संबंधित जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले पडताळणी अधिकारी यांना पडताळणीच्या वेळी व एक प्रत सक्षम प्राधिकारी अल्पसंख्याक विभाग यांच्याकडे सुनावणीच्या वेळी सादर करावी.

vii) अर्जदार संस्थेने सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी संबंधित जिल्हाधिकारी /प्राधिकृत पडताळणी अधिकारी तसेच अंतिम सुनावणीच्या वेळी छाननी प्राधिकारी व सक्षम प्राधिकारी यांच्यासमोर सादर करणे बंधनकारक आहे.

**२) शुल्काची अदायगी :-** अर्जदार संस्थेने अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्राकरीता केलेला अर्ज सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असेल तर सदर अर्जावर सक्षम प्राधिकारी सुनावणी आयोजित करतील. सुनावणीच्या वेळी अर्जदाराने अवर सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांच्या नांवे रु.५,५००/- चा धनाकर्ष अदा करावा अथवा online portal द्वारे रु.५,५००/- इतके शुल्क अदा करावे. सदर शुल्क अदा केल्याशिवाय संस्था सुनावणीकरीता पात्र ठरणार नाही.

३) **ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांच्या पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे / पुरावे :-** खालील कागदपत्रे/पुरावे स्कॅन करुन ऑन लाईन पध्दतीने अर्जासोबत अपलोड करावीत, संस्थेने सुनावणीच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे / पुरावे सादर करावे.

i) **ट्रस्ट / कंपनी / फर्म / संस्था नोंदणी प्रमाणपत्र :-** अर्जदार ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांचे नोंदणी अधिनियम-१८६० / मुंबई सार्वजनिक संस्था अधिनियम-१९५० /वक्फ बोर्ड किंवा इतर संबधित संविधीखालील नोंदणी केलेले प्रमाणपत्र

ii) **ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांचा उद्देश:-**

(a) ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांच्या मेमोरेंडम /आर्टिकल ऑफ असोशिएशन / उद्देशातील / घटनेत / नियमावलीत /उपविधी मध्ये अल्पसंख्याक संस्था ज्या धार्मिक / भाषिक समाजासाठी स्थापन करण्यात आली असेल त्या धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक समाजाच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी स्थापन करण्यात आली आहे असे नमूद केलेले असले पाहिजे.

किंवा

(b) उद्देशामध्ये वरील प्रमाणे नमुद नसल्यास संस्थेने संबंधित उपविधी /नियम/घटना किंवा नियमावलीत उद्देशवाढ करण्याबाबत संस्था विश्वस्त/सदस्य यांचा ठराव घेवून, उद्देशवाढ करण्यासाठी संबंधित धर्मादाय आयुक्त किंवा सबंधित प्राधिकरण यांच्याकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत. (त्यावरती धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाने स्विकृत केलेला सही व शिक्का असलेली प्रत.

किंवा

(c) प्रपत्र-२ येथे नमूद केलेले प्रतिज्ञापत्र

***# ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांनी त्यांच्या मेमोरेंडम /आर्टिकल ऑफ असोशिएशन / उद्देशातील / घटनेत / नियमावलीत /उपविधीचे पहिले पृष्ठ व ज्यापृष्ठावर उद्देश नमूद केलेला आहे ते पृष्ठ scan करुन अपलोड करावे*व सुनावणीच्या वेळी संपूर्ण ट्रस्ट डिड सादर करावे.**

iii) <u>विश्वस्त /सदस्य यांच्या धर्म व मातृभाषा याबाबतचेे पुरावे</u>

a) अनुसूचि-१ किंवा मूळ ट्रस्ट डिड :- आयुक्त धर्मादाय किंवा इतर प्राधिकरण यांच्या कडे नोंद झालेल्या सर्व मूळ विश्वस्त/सदस्य यांच्या नावाची यादी. अनुसूची १ ची प्रत उपलब्ध नसेल तर मुळ ट्रस्ट

डिड किंवा अनुसूची -२ यामध्ये नमूद केलेली मूळ विश्वस्त/सदस्य यांच्या नावाची प्रत. (धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांची सही व शिक्का असलेली मूळ प्रत.)

b) अनूसूचि-३ धर्मादाय आयुक्त किंवा इतर प्राधिकरण यांच्या कडे नोंद झालेल्या संस्थेचा सध्याच्या विश्वस्त/सदस्य यांची माहिती (धर्मादाय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांची सही व शिक्का असलेली मूळ प्रत.)

iv) संबंधित ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांचे अध्यक्ष/सचिव यांनी प्रपत्र-२ येथे नमूद केल्याप्रमाणे संस्थेचे मूळ व सध्याचे विश्वस्त / सदस्य हे ५० टक्के पेक्षा जास्त संबंधिक धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक समुहातील असल्याचे तसेच संबंधित ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांच्या सदस्यांमध्ये कोणतेही न्यायिक वाद विवाद नसल्याबाबत ***प्रपत्र-२***नुसारचे रु.१००/- च्या अर्धन्यायिक कोर्ट फी स्टॅम्पपेपरवर Notarised प्रतिज्ञापत्र.

v) **धार्मिक किंवा भाषिक पुरावे :-** ट्रस्ट / कंपनी / फर्म / संस्था यांचे कमीत कमी ५० टक्के पेक्षा जास्त सध्याचे विश्वस्त / सदस्य यांचे धार्मिक / भाषिक पुराव्यासाठी आवश्यक कागदपत्रे.

a) **धार्मिक :-** विश्वस्त/सदस्य यांचा शाळा सोडल्याचा दाखला व शाळा प्रवेश निर्गमन उतारा ज्यामध्ये धर्माचा उल्लेख असणे आवश्यक किंवा बाप्तिस्मा प्रमाणपत्र किंवा दिक्षा प्रमाणपत्र किंवा संबंधित अल्पसंख्याक समाजाच्या संघटनेने किंवा धर्म प्रमुखाने दिलेले प्रमाणपत्र किंवा संबंधित सदस्यांचे/विश्वस्तांचे आपल्या धर्माविषयी **प्रपत्र-२** येथे विहित केलेले रु. १००/- च्या अर्धन्यायिक कोर्ट फी स्टॅम्पपेपरवर Notarised प्रतिंज्ञापत्र.

b) **भाषिक :-** संबंधित सदस्यांच्या मातृभाषेचा उल्लेख असलेला शाळा सोडल्याचा दाखला किंवा शाळा निर्गमन उतारा किंवा विश्वस्त/सदस्य यांच्या मातृभाषेचा पुरावा म्हणून प्रपत्र-२ नुसार रु.१००/- अर्धन्यायीक कोर्ट फि स्टॅम्पपेपरवर Notarised प्रतिज्ञापत्र सादर करणे .

vi) **रहिवासी पुरावा :-** ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्था यांनी त्यांच्या सध्याच्या ज्या सदस्यांचे धार्मिक व भाषिक पुरावे सादर केलेले आहेत त्यांचेच महाराष्ट्रातील रहिवाशी असल्याचे पुरावे सादर करावेत, यासाठी विश्वस्त / सदस्य यांनी त्यांचे नांवे असलेले आधारकार्ड / निवडणूक ओळखपत्र / पासपोर्ट / तहसिलदार यांनी प्रदान केलेले अधिवास प्रमाणपत्र / तसेच ग्रामसेवक, महानगरपालिका वॉर्ड

अधिकारी, मुख्याधिकारी, नगरपालिका यांनी दिलेले रहिवास प्रमाणपत्र / टेलिफोन बिल / लाईट बिल / पॅनकार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / राष्ट्रीयकृत बँकेचे फोटो असलेले पासबुक यापैकी कोणताही एक पुरावा.

vii) **विश्वस्त /सदस्य यांच्या नावांत बदल** :- ट्रस्ट/कंपनी/फर्म/ संस्था यांच्या सध्याच्या विश्वस्त अथवा सदस्य यांच्या शाळा सोडल्याचा दाखला अथवा संस्थेच्या अनुसूची १ तसेच अनुसूची ३ मध्ये दर्शविण्यात आलेल्या नावांत काही कारणाने बदल झाला असेल (जसे, लग्न, धार्मिक संस्थेस रुजू असलेले धर्मगुरु इत्यादी) तर सदर नांवात बदल झाल्याबाबत वैधानिक पुरावा जसे शासन अधिसूचना, certification by the religious congregation etc किंवा **प्रपत्र-३** मधील नमुन्यानुसार रु.१००/- च्या अर्धन्यायिक स्टॅम्पपेपर नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र अपलोड करावे.

viii) **अर्जदार संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांच्या मान्यतेच्या पुराव्याबाबत** :- शालेय शिक्षण/व्यवसाय शिक्षण/ तंत्रशिक्षण/ वैद्यकिय शिक्षण विभाग, विद्यापीठ अथवा NCVT, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगर पालिका यांचे शिक्षण अधिकारी तसेच अपंग कल्याण संचालनालय सामाजिक न्याय विभाग यांनी अथवा इतर प्राधिकृत संस्थांनी अर्जदार ट्रस्ट / संघटना / संस्थेस शैक्षणिक संस्था चालविण्याबाबत / सुरु ठेवण्याबाबत निर्गमित केलेले आदेश अथवा पत्र .

जर अर्जदार संस्थेने त्यांच्या मार्फत चालविण्यात येत असलेली शाळा / महाविद्यालय दुस-या संस्थेकडून हस्तांतरणाद्वारे घेतली असेल तर त्या संस्थेचे अनुसूची - I सादर करणे आवश्यक आहे. तसेच शाळा / महाविद्यालय सुरु केलेल्या संस्थेचे ५० टक्क्यापेक्षा अधिक मुळ सदस्य संबधित (मागणी केलेल्या) अल्पसंख्याक समुदायाचे असणे आवश्यक आहे.

वरील **सर्व मुळ कागदपत्रे पडताळणीच्या वेळी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तसेच सुनावणीच्या वेळी सक्षम प्राधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील. तसेच सर्व मूळ प्रतिज्ञापत्र सुनावणीच्या वेळी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे जमा करणे बंधनकारक राहील.**

(४) ट्रस्ट/कंपनी/फर्म/संस्था यांनी सादर केलेल्या प्रस्तावाची जिल्हाधिकाऱ्यामार्फत पडताळणी :-

i) **संगणक प्रणाली मार्फत अर्जाची स्विकृती :-अर्जदाराने** सर्व आवश्यक स्कॅन्ड कागदपत्रासह सादर केलेला अर्ज Online पध्दतीने संगणक प्रणालीवर अपलोड करावा. पूर्ण भरलेला आवश्यक त्या सर्व कागदपत्र स्कॅन करुन upload केलेला अर्ज online पध्दतीने स्विकारण्यात येईल.

ii) **अर्जाच्या पडताळणीचा दिनांक :-** अर्जदाराने ऑनलाईन पध्दतीने केलेला अर्ज संगणकिय प्रणालीने स्विकारल्यानंतर, अर्ज स्विकारण्याच्या दिनांक पासून १५ दिवसात संगणकीय प्रणालीमार्फत अर्ज पडताळणीचा दिनांक निश्चित केला जाईल व अर्जदारास email व sms द्वारे कळविण्यात येईल.

iii) **अर्जाची पडताळणी करुन जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांनी सक्षम प्राधिकारी यांच्या कडे अर्ज पाठविणे :-**

**(अ)** पडताळणीच्या दिनांकास अर्जदाराने अर्जासोबत सादर केलेल्या मुळ कागदपत्रांसह अध्यक्ष / सचिव / सदस्य / विश्वस्तांमार्फत त्याच्या ओळखीच्या पुराव्यासह जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या पडताळणी अधिकाऱ्यांसमोर पडताळणी करीता उपस्थित रहावे.

जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या पडताळणी अधिकारी यांनी अर्जाच्या पडताळणीच्या दिवशी अर्जदाराने अर्जासोबत स्कॅन करुन सादर केलेल्या कागदपत्रांची मुळ कागदपत्रे तपासावीत. सदर पडताळणीच्या दरम्यान अर्जदाराने सर्व मुळ कागदपत्रे सादर केलेली नाहीत असे आढळून आल्यास, अर्जदारास संगणक प्रणाली निर्मित २० दिवसांच्या मुदतीची एक संधी कागदपत्रे सादर करण्याठी देण्यात येईल.

**(ब)** तद्नंतर जिल्हाधिकारी अर्जदाराने पडताळणीच्या दरम्यान सादर केलेली / सादर न केलेली मुळ कागदपत्रे चेकलिस्ट मध्ये नोंदवून ऑनलाईन द्वारा सक्षम प्राधिका-यांना पाठवेल. अर्जदारास email व SMS द्वारे कळविण्यात येईल.

**(५) संगणक प्रणाली मार्फत अर्ज स्वयंचलितपणे सक्षम प्राधिकाऱ्यांस सादर करणे :-** संगणक प्रणालीद्वारे स्विकृत केलेल्या अर्जावर जिल्हाधिकारी / प्राधिकृत पडताळणी अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जावर २० दिवसात कार्यवाही केली नाही तर संगणक प्रणाली मार्फत असे अर्ज स्वयंचलितपणे सक्षम प्राधिकाऱ्याकडे विचारार्थ प्राप्त होतील.

**(६) सक्षम प्राधिकाऱ्यापुढे सुनावणी :-**

(i) **सक्षम प्राधिका-यामार्फत छाननी :-** जिल्हाधिका-यांकडून ऑन लाईन द्वारे प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात सक्षम प्राधिकारी यांच्यामार्फत करण्यात येईल व **अर्जदाराला सुनावणीची तारीख email / sms द्वारे अवगत करण्यात येईल. या दिवशी अर्जदार / त्याचे प्रतिनिधी यांनी सर्व मुळ कागदपत्रासह सुनावणी करीता उपस्थित रहावे. याकरीता कोणतीही पत्र व्यवहार केला जाणार नाही.**

(ii) **सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र देणे:-** जिल्हाधिका-यांनी अर्जाची पडताळणी करुन अर्ज ऑन लाईन द्वारे सक्षम प्राधिका-याकडे पाठविल्यानंतर तसेच अर्जदाराच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत २० दिवसात सक्षम प्राधिकाऱ्यास जिल्हाधिका-यांनी अवगत केले नाही तर संगणक प्रणाली मार्फत स्वयंचलितपणे प्राप्त झालेल्या अर्जावर आणि अर्जदाराने संगणक प्रणाली मार्फत स्वयंचलितपणे प्राप्त केलेल्या सुनावणीच्या दिवशी सक्षम प्राधिकारी सुनावणी घेतील. अर्जदाराचा अर्ज व मुळ कागदपत्रे योग्य असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यांस आढळून आल्यास सक्षम प्राधिकारी अर्जदारास अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र प्रदान करतील व त्याचे आदेश विभागाच्या संकेतस्थळावर (web site) प्रसिध्द करतील. सदरची कार्यवाही अर्जदारास email द्वारे व SMS द्वारे अवगत केली जाईल.

(iii) **अपूर्ण अर्ज निकाली काढणे :-** अर्जदाराने आवश्यक ती कागदपत्रे सादर केली नाहीत तर अर्जदाराचा अर्ज सक्षम प्राधिकाऱ्यांकडून निकाली काढण्यात येईल. सदरची कार्यवाही अर्जदारास e-mail द्वारे व SMS द्वारे अवगत केली जाईल. इच्छुक संस्था ऑनलाईन पध्दतीने पुन्हा अर्ज सादर करु शकतील.

(iv) **अर्ज नाकारणे :-** सक्षम प्राधिका-यास सुनावणी असे आढळून आले की, ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्थेचे मूळ अथवा सध्याचे सदस्य हे अर्जदार ट्रस्ट / कंपनी /फर्म / संस्थेने ज्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्राकरीता अर्ज केला आहे त्या अल्पसंख्यांक समाजाचे ५० टक्क्यापेक्षा जास्त सदस्य संबंधित अल्पसंख्याक समाजाचे नसतील किंवा ५० टक्क्यापेक्षा जास्त सदस्य महाराष्ट्राचे रहिवासी नसतील तर आदेशाद्वारे अर्जदाराचा अर्ज नाकारण्यात येईल. सदरची कार्यवाही अर्जदारास e-mail द्वारे व SMS द्वारे देखील अवगत केली जाईल.

७. **अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र रद्य करण्याबाबत** :- अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेस प्रदान केलेली धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक दर्जाची मान्यता सक्षम प्राधिकारी स्वत:हुन अथवा संस्थेबाबत पुढील प्रमाणे तक्रार प्राप्त झाली असेल तर रद्द करण्यात येईल.

(i) मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था संबंधित अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक हिताच्या विरुध्द काम करीत असेल अथवा

(ii) जर मान्यता प्राप्त शैक्षणिक संस्था प्रस्तुत शासन निर्णयातील परिच्छेद-५ व परिच्छे-६ मधील तरतुदींचा भंग करीत असेल अथवा

(iii) संस्थेने सक्षम प्राधिकाऱ्यास चुकीची / दिशाभूल करणारी माहिती सादर करुन अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्राची मिळविले असेल तर,

(iv) अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित डीएड, बीएड, व्यावसायिक व तांत्रिक शैक्षणिक शैक्षणिक संस्थांनी सलग तीन शैक्षणिक वर्षात अल्पसंख्यांक कोटयात उपलब्ध असलेल्या ५० % / ५१% जागाच्या बदल्यात अल्प प्रमाणात अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्रवेश दिले तर, अशा शैक्षणिक संस्थांचा अल्पसंख्यांक दर्जा रद्य करणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

(v) स्वत:हून संस्थेने त्यांचा वैयक्तिक कारणामुळे अल्पसंख्यांक दर्जा मान्यता रद्द करण्याबाबत अर्ज सादर केला असेल तर,

अल्पसंख्यांक दर्जाची मान्यता काढून घेणे बाबतचे कोणतेही आदेश देण्यापुर्वी सक्षम प्राधिकारी संबंधित संस्थेस सुनावणीची संधी देतील व तद्नंतर आदेश निर्गमीत करतील.

८. **सक्षम प्राधिका-याचे आदेशाविरुध्द दाद** :- सक्षम प्राधिका-यांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थेस अल्पसंख्याक दर्जाची मान्यता नाकारल्याबाबत किंवा शैक्षणिक संस्थेची अल्पसंख्याक दर्जाची मान्यता रद्य केल्याबाबत जारी केलेल्या आदेशांविरुध्द अपिलिय अधिकारी तथा अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे अशा आदेशाच्या दिनांक पासून ९० दिवसात अपिल करता येईल.

सदर शासन निर्णय महसुल व वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५२९१७२८००४२१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचेराज्यपालयांच्याआदेशानुसारवनावाने.

Thanksy Francis Thekkekara

Digitally signed by Thanksy Francis Thekkekara
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITY DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=MAHARASHTRA, cn=Thanksy Francis Thekkekara
Date: 2013.06.03 15:47:27 +05'30'

**(डॉ. टी. एफ. थेक्केकरा)**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४. मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
६. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
७. प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
८. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठ, नागपूर
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
११. प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय, मुंबई
१२. धर्मादाय आयुक्त, मुंबई / सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,
१३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर

१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

१६. सर्व विभागीय आयुक्त,

१७. सर्व जिल्हाधिकारी

१८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१९. सर्व मंत्रालयीन विभाग

२०. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई

२१. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई

२२. संचालक, वैद्यकीय शिक्षण, मुंबई

२३. संचालक, समाजकल्याण संचालनालय, पुणे

२४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

२५. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्चमाध्यमिक),

२६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई

२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (प्रसिध्दीसाठी)

२८. निवडनस्ती.

## प्रपत्र १

**धार्मिक/भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेला अल्पसंख्यांक म्हणून मान्यता मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना**

<table>
<tr><td rowspan="3">१.</td><td colspan="5">अ) संस्थेचे संपूर्ण नांव</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="5">ब-१) संस्थेच्या अध्यक्षांचे<br>नांव , पत्ता व मोबाईल क्रमांक व ई-मेल</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td colspan="5">ब-२) सचिवांचे नांव , पत्ता व मोबाईल क्रमांक व ई-मेल</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="5">संस्थेच्या कार्यालयाचा संपूर्ण पत्ता,<br>फोन क्र. फॅक्स क्र. इ-मेल क्र. व वेबसाईट पत्ता</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="5">संस्थेचा नोंदणी क्रमांक व नोंदणी झाल्याचा दिनांक-<br>कार्यालयाचे नांव (सोबत संबंधित कागदपत्रांची साक्षांकित प्रत जोडावी )</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>५.</td><td colspan="5">मागणी केलेला अल्पसंख्यांक दर्जा</td><td colspan="3">धार्मिक भाषिक</td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="5">केंद्र/राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या १) मुस्लिम २) ख्रिश्चन ३) शीख ४) बौध्द ५) पारसी ६) जैन यापैकी कोणत्या धर्माची संस्था आहे.</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="5">भाषिक अल्पसंख्यांकांच्या बाबतीत कोणत्या भाषेकरिता अल्पसंख्यांक दर्जा हवा आहे?</td><td colspan="3"></td></tr>
<tr><td rowspan="3">८</td><td colspan="8">संस्थेच्या मूळ विश्वस्तांची / संचालक मंडळाची संपूर्ण नावे व प्रत्येकाचा धर्म किंवा मातृभाषा</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td colspan="2">संपूर्ण नांव</td><td colspan="3">धर्म</td><td colspan="2">मातृभाषा</td></tr>
<tr><td></td><td colspan="2"></td><td colspan="3"></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td rowspan="3">९.</td><td colspan="8">संस्थेच्या सध्याच्या विश्वस्तांची/संचालक मंडळाची संपूर्ण नावे व प्रत्येकाचा धर्म व मातृभाषा</td></tr>
<tr><td>अ.क्र.</td><td colspan="2">संपूर्ण नांव</td><td colspan="3">धर्म</td><td colspan="2">मातृभाषा</td></tr>
<tr><td></td><td colspan="2"></td><td colspan="3"></td><td colspan="2"></td></tr>
<tr><td>१०</td><td colspan="3">संस्थेच्या मूळ अल्पसंख्यांक विश्वस्त / सदस्य यांची संख्या</td><td>एकूण</td><td colspan="2">अल्पसंख्यांक सदस्य संख्या</td><td colspan="2">बिगर अल्पसंख्याक सदस्य संख्या</td></tr>
<tr><td>११</td><td colspan="3">संस्थेच्या सध्याच्या अल्पसंख्यांक विश्वस्त सदस्यांची संख्या</td><td>एकूण</td><td colspan="2">अल्पसंख्यांक सदस्य संख्या</td><td colspan="2">बिगर अल्पसंख्याक सदस्य संख्या</td></tr>
<tr><td>१२</td><td colspan="3">संस्थेने त्यांच्या घटनेमध्ये धार्मिक/ भाषिक अल्पसंख्यांकामधील व्यक्तींचा सर्वांगीण विकास आणि /किंवा याच्या बद्दल प्रतिज्ञापत्र दिले आहे का ?</td><td colspan="3">होय</td><td colspan="2">नाही</td></tr>
</table>

**अर्जदार**
**संस्थेचे अध्यक्ष / सचिव**

**ठिकाण :-**
**दिनांक :-**

- आवश्यक नसेल ते खोडावे.

प्रपत्र -२

**(प्रस्तुत प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या अर्धन्यायिक स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन अध्यक्ष व सचिव यांच्या स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे.)**

**धर्म, भाषा व उद्देशाबाबत प्रतिज्ञापत्र**

आम्ही (नांव) अध्यक्ष, (नांव) सचिव (संस्थेच्या नावाचा उल्लेख करावा) संस्थेच्या नोंदणीकृत पत्त्याचा उल्लेख करावा) प्रतिज्ञापुर्वक असे प्रतिपादन करतो की,

(१) आमची सोसायटी / ट्रस्ट / संस्था ही -----या धार्मिक* व / ------ या अल्पभाषिक* समाजाची शैक्षणिक संस्था असून सदर संस्था ही --- या धार्मिक* व / ----या अल्पभाषिक* समाजाच्या शैक्षणिक हितासाठी व उन्नतीसाठी काम करीत आहे.

(२) आमच्या संस्थेचे / सोसायटीचे / ट्रस्टचे* मुळ एकूण -------सदस्य / विश्वस्त असून आमचे ५०% पेक्षा जास्त सदस्य / विश्वस्त हे ----- या धार्मिक * व / ----- या अल्पभाषिक* समाजाचे असून त्याबाबतचे विवरण पुढीलप्रमाणे आहे.

**संस्थेच्या स्थापनेचे वर्ष :**

**मुळ विश्वस्त / सदस्यांची माहिती**

| अ.क्र. | विश्वस्त / सदस्यांचे नांव | धर्म* | मातृभाषा* |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

(३) सध्या आमच्या संस्थेचे / सोसायटी/ट्रस्टचे * एकूण ------ विश्वस्त / सदस्य *असून त्यापैकी ५० टक्यापेक्षा जास्त सध्याचे विश्वस्त / सदस्य* हे ------ धार्मिक / ---- अल्पभाषिक* समाजाचे असून त्याचे विवरण पुढील प्रमाणे आहे.

**सध्याचे विश्वस्त / सदस्यांची माहिती वर्ष :**

| अ.क्र. | विश्वस्त सदस्यांचे नांव | धर्म* | मातृभाषा* | फोटो | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

४. आमच्या संस्था / सोसायटी / ट्रस्टचे * यांच्या सदस्यांमध्ये कोणतेही वादविवाद नाहीत व कोणत्याही न्यायालयात संस्थेशी संबंधित सभासदांबद्दल वादविवाद सुरु नाही.

वर नमूद केलेली माहिती सत्य व बरोबर असून ती असत्य व खोटी असल्याचे आढळून आल्यास कायदेशीर/दंडात्मक कार्यवाही होवू शकते यांची आम्हाला पुर्ण जाणीव आहे

**१.अध्यक्षांचे नांव सही /-**
**२. सचिवांचे नांव सही /-**
**संस्थेचे/सोसायटीचे /ट्रस्टचे सिल**

* आवश्यक नसेल ते खोडावे.

## प्रपत्र -३

**( प्रस्तुत प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या अर्धन्यायिक स्टॅम्प पेपरवर नोटरी करुन सादर करणे )**
**( सदस्य/विश्वस्त यांच्या नांवान बदलाबाबत केलेले -------- नोटरी केलेले प्रतिज्ञापत्र)**

**संस्थेचे नांव-----------** संस्थेचा नोंदणीकृत पत्ता-----------

मी श्री/श्रीमती/Father/Sister * -------- नांव,------- या संस्थेचा सदस्य / विश्वस्त / अध्यक्ष / सचिव* असून सदर संस्थेचा नोंदणीकृत पत्ता ------------------------------ या प्रमाणे आहे. मी प्रतिज्ञापुर्वक असे प्रतिपादन करतो की, माझे मूळ नांव शाळेच्या दफ्तराच्या नोंदीनुसार ----- असे आहे. माझे लग्न झाल्याने / धर्माचे पद स्विकारल्याने / वैयक्तिक कारणामुळे* माझे नांव --------या प्रमाणे बदलले असून माझ्या सर्व कार्यालयीन दाखल्यात तशी नोंद केलेली आहे.

वर नमूद केलेली माहिती सत्य व बरोबर असून ती असत्य व खोटी असल्याचे आढळून आल्यास कायदेशीर/दंडात्मक कार्यवाही होऊ शकते याची मला पुर्व जाणीव आहे.

**सही /-**

**संबंधित सदस्याचे नांव**
**संस्थेचे/सोसायटीचे /ट्रस्टचे सिल**

* आवश्यक नसेल ते खोडावे.

**प्रपत्र - ४**

**अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्याक कोट्यातील जागा भरण्याकरीता जाहिरातीचा नमुना** किमान ८ x ८ से.मी.

**ट्रस्टचे / संस्थेचे नांव संचलित**
**कॉलेजचे नांव व पत्ता**

**शैक्षणिक वर्ष २० - करीता खालील अभ्यासक्रमांच्या --------धार्मिक / भाषिक अल्पसंख्यांक कोटयातील जागा भरण्याकरीता पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | शाखा / अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता | अल्पसंख्यांक कोटयातील जागा | बिगर अल्पसंख्यांक कोटयातील जागा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

- **अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेचे प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**
  १. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक : -
  २. गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक : -
  ३. प्रवेशाचा दिनांक : -

प्रवेश अर्ज --------- ठिकाणी रु. /- चा रोख / डी.डी. जमा केल्यानंतर प्राप्त होईल.

**संस्थेचे संकेतस्थळ ई-मेल -**
**दुरध्वनी क्रमांक**

**प्राचार्य**
**संस्थेचे नांव**

प्रपत्र - ५

डी.एड., बी.एड., तांत्रिक व व्यावसायिक मान्यताप्राप्त अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांनी खालील माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रति वर्षी सादर करावी तसेच त्यानंतर दोन आठवड्याच्या आत अल्पसंख्याक विकास विभागाच्या पोर्टल (portal) वर भरावी.

अ) अल्पसंख्याक संस्थेने केलेल्या प्रवेशाबाबतची माहिती :-

संस्थेचे नांव :-

महाविद्यालयाचे नांव :-

शैक्षणिक वर्ष :-

| अ. क्र. | अभ्यासक्रम | मंजूर प्रवेश क्षमता | अल्पसंख्याक कोटा (अनुदानित संस्था : ५० % विना - अनुदानित : ५१%) | अल्पसंख्याक कोटया तील भरण्यात आलेल्या जागा | अल्पसंख्याक कोटया तील शिल्लक / रिक्त जागा | अल्पसंख्याक कोटयातून भरण्यात आलेल्या जागांची टक्केवारी | अल्पसंख्याक कोटयातील शिल्लक / रिक्त जागा बिगर अल्पसंख्याक उमेदवारा तून भरण्यास मान्यता दिली होती किंवा कसे असल्यास आदेश क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

ब) अल्पसंख्याक कोटयातील जागा भरण्याच्या दृष्टीने संस्थेने केलेल्या प्रयत्नांचा तपशिल

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नांव | भाषा | जाहिरातीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |

क) अल्पसंख्याक कोटयातील प्रवेशाची माहिती

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | अर्ज प्राप्त विद्यार्थ्याचे नावे | अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशीत विद्यार्थ्याची नांवे | प्रवेश नाकारलेल्या विद्यार्थ्यांची नांवे | प्रवेश न देण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

-*-*-*-*-